**कृपया प्रसिध्दीसाठी** **23 एप्रिल 2009**

## मढ, भाटी, एरंगळ गावांमध्ये श्री राम नाईक यांचा झंझावाती प्रचार

**मुंबई, गुरुवार :** मच्छिमारांना डिझेलवर मिळणारा परतावा पेट्रोलियम मंत्री असताना वाढवून तीन रुपये केला आणि आता तोच परतावा काँग्रेस सरकारने मात्र रद्द केला. यामुळे साहजिकच मालाड येथिल मच्छिमारी गावांमध्ये श्री. राम नाईक प्रचाराला गेल्यावर त्यांना मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

उत्तर मुंबई लोकसभा क्षेत्रामध्ये मालाड येथे मढ, भाटी, एरंगळ, आक्सा, मार्वे अशी अधिकतर मच्छिमारांची वस्ती असलेली गावे आहेत. या सर्व मच्छिमारांना वेळोवेळी त्यांच्या अडीअडचणीमध्ये श्री. राम नाईक साथ देते आले आहेत. स्वाभाविकच काल भाजप-शिवसेना युतीचे उमेदवार म्हणून श्री. राम नाईक या भागात आले तेव्हा गावक-यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. या गावांमधील छोटे-छोटे रस्ते श्री. राम नाईक यांना बघायला-ऐकायला गर्दीने फूलून गेले. यावेळी मतदारांशी संवाद साधताना श्री. राम नाईक म्हणाले "देशामध्ये मत्स्य दुष्काळ आहे हे काँग्रेस सरकारच्या गावीच नाही अशा परिस्थितीत मच्छिमारांना आणखीन सवलत देण्याऐवजी डिजल परताव्याची आहे ती सवलतही सरकारने काढून घेतली. श्री. लालकृष्ण आडवाणी पंतप्रधान झाल्यानंतर मच्छिमारांना ही सवलत वाढीव दराने मिळेल याची खात्री बाळगा." यावेळी बोलताना शिवसेना उपविभागप्रमुख व माजी नगरसेवक श्री. अशोक पटेल यांनीही मतदारांना मोठया संख्येने मतदान करुन भाजपा-शिवसेना युतीचे सरकार निवडून देण्याचे आवाहन केले.

शिवसेना नगरसेविका श्रीमती रेणूका दिवे, भाजपा मुंबईचे उपाध्यक्ष श्री.जयप्रकाश ठाकूर तसेच युतीचे अन्य स्थानिक नेते सर्वश्री अजित भंडारी, हेवन मेंडीस, राजेश सिंह, भवरसिंह वालीया, भारत कोळी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते मतदार प्रचार यात्रे मध्ये सहभागी झाले होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**मोबाईल क्र. 9867689540**